UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

## पुरवणी अंक १६ – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)

● शके १९४५ ● वर्ष : ९१ ● पुरवणीअंक : १६

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

● प्रा.गणेश बेले ● प्रा.डॉ.प्रमोद अलोने ● प्रा.डॉ.किशोरचंद्र रेवतकर

**❊ प्रकाशक ❊**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
ई–मेल : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

अंक मूल्य ₹ १००/–
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/–; सदस्यता वर्गणी : रु. २५००/–

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१ **Building the Future: Transforming Libraries for Sustainability**
**- Dr.Sarika Choudhari, Wadner, Dist.Wardha.** ------------------------ ५

२ **Startup India: Challenges and Opportunities**
**- Prof. Satiosh Jadhao, Movad, Tal.Narkhed** ------------------------ १०

३ **Quest for 'Self ' : A Study of Taslima Nasreen's French Lover**
**- Dr.Seema Sharma, Bikaner, Rajasthan** ------------------------ १५

४ **Sita's Resurgence : Unravelling Feminist Perspectives in Modern Ramayana Retellings - 1) Prof. Seema Soni; 2) Dr. Seema Sharma, Bikaner** ---------- १९

५ **E-Learning Initiatives for Rural Women in Maharashtra: A Comprehensive Analysis of Technology, Education, and Social Policy Frameworks**
**- Prof. Shaikh Aveshkharni Shaikh Kabir, Kamptee, Dist.Nagpur** ---------- २३

६ **Implementation of and Challenges faced with respect to Information Literacy Program Organization in University Libraries of Maharashtra**
**- 1) Prof.Shamkumar Gorde, 2) Dr.Harshal Nimbhorkar, Badnera, Amrawati** -- २९

७ **Understanding Problems of English Language Teaching at Undergraduate Level in Rural Regions and Practical Solutions**
**- Dr.Sharad Vihirkar, Hinganghat, Dist.Wardha** --------------------- ३५

८ **Jasoda's Perennial Struggle Against Patriarchy, Poverty And Societal Perceptions In Kiran Nagarkar's 'Jasoda'- Dr.Shravan Banasure, Ballapur, Dist.Chandrapur** - ३९

९ **Identity Crisis of House Elves in Harry Potter Series**
**- Dr. Sneha S. Joshi, Amrawati** -------------------------------- ४२

१० **Fixing Gender Roles Through Violence In The Novel Honour By Elif Shafak**
**- 1)Prof.Sneha Popate, 2)Dr.Yuvraj Meshram, Chandrapur** -------------- ४७

११ **Women's Empowerment in Cooperative Enterprises: Bridging the Gender Gap and Cultivating Inclusivity - Prof. Satyalaxmi Shetty, Samudrapur, Dist.Wardha** --- ५१

१२ **Role Of Library In Modern Society: Future Challenges And Opportunities**
**- Prof. Sunil Narnaware, Movad, Dist.Nagpur** ---------------------- ५६

१३ **Awareness of Gender Equality and Women Rights Among Females**
**- Dr. Sushma Funde, Nagpur** ---------------------------------- ६१

१४ **Unveiling the digital frontier: Exploring technologies, challenges and future horizons in digital libraries - Dr.Suvarna Parab, Chembur, Mumbai** -------- ६५

१५ **Flesh Trade: The Worst Form Of Gender Exploitation**
**- Dr. Suwarna Mangrulkar, Chandrapur** -------------------------- ७०

१६ **Identity Crisis in Kiran Desai's novel "The Inheritance of Loss**
**- Dr. Swapnil Dahat, Kamptee, Dist.Nagpur** ------------------------ ७३

१७ **Unification related to Foreign Capital as per Globalisation and the Free market Economic (FME) - Dr.Swarnalata Warke, Nagpur** ------------------- ७७

१८ Contribution of Net Banking under Digital Financial Transactions in Indian Economy
– 1)Prof. Shweta Gundawar; 2)Dr.Usha Khandale, Chandrapur ------------ ८१

१९ The Elements of Diaspora in the Poetry of A. K. Ramanujan
– Prof. Swati Mandwane, Ardhapur, Dist.Nanded -------------------- ८५

२० GIG Economy In India – Dr.Siddharatha Meshram, Kamptee, Dist.Nagpur --- ८८

२१ Innovative Techniques: Modernizing The Criminal Justice System And Judicial Practices – 1) Prof.Vaishali Khotele (Shiwatkar); 2)Dr.Pankaj Kakde ------- ९३

२२ Socio-cultural Implications in Wole Soyinka's Kongi's Harvest
– Dr.M.Venkateshwari, Tiruchirappalli, TaminNadu ------------------- ९८

२३ User Satisfaction of Public Library Resources and Services: A Case Study of Public Libraries in Gadchiroli Taluka
– Prof.Umesh Harde, Bramhapuri, Dist.Chandrapur ------------------ १०२

२४ Unveiling the Struggles : A Comprehensive Exploration of Women's Challenges in the Literary Works of Vikas Swarup
– Dr.Vaibhav Pimple, Seloo, Dist.Parbhani ------------------------ १०५

२५ A Study on the Awareness and Attitude of online transactions
– Dr.Vinod Dongarwar, Nagpur -------------------------------- १०९

२६ Role of Librarian in the Changing Society
– 1)Prof.Virendrakumar Barde, Ralegaon, Dist.Yavatmal
2) Prof.Avinash Yete, Konda-Kosra, Dist.Bhandara ------------------ ११४

२७ A Study on the Causes and Impact of Unemployment in India
– Dr.Vishal Varma, Latur ------------------------------------ ११८

२८ Sylvia Plath's Daddy A Critique of Androcentric Ideology: A Reflection
– Dr.Vishnu Chavan, Koradi, Dist.Nagpur ------------------------ १२३

२९ The Multifaceted Significance of Patent Classification in the Digital Age
– 1) Prof.Vrushabh Dahake,; 2) Dr.Mahendra Mete, Amrawati ---------- १२६

३० The AI Revolution in Libraries : Enhancing Access and Services for Knowledge Resource Centers– Prof.Vivek Jagtap, Ghatanji, Dist.Yavatmal ---------- १३१

३१ Digital India & Its Contribution & Impact on the Economy - A Study
– Dr.Vivek Patil, Anjangaon Surji ------------------------------- १३५

३२ Plant Nursery Business : A New Way Of Entrepreneurship In Wardha District, Maharashtra – Prof.Vaishali Tadas, Samudrapur, Dist.Wardha ---- १३९

३३ ग्रामीण विकासात शिक्षण आणि आरोग्य या सामाजिक सुविधांची भूमिका
– प्रा.उपेंद्र बागुल, उमरेड, जि.नागपूर. -------------------------------- १४४

३४ आत्मनिर्भर भारत व राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने योगशास्त्राची प्रासंगिकता
– डॉ.वसंत निनावे, मोवाड, जि.नागपूर ------------------------------- १४९

३५ उच्च शिक्षणात (NEP–२०२०) ऑनलाइन आणि डिजिटल शिक्षण: समाज कार्यकर्त्यांचे मूल्यांकन
– डॉ.विजय घुबळे, नरखेड, जि.नागपूर. ------------------------------ १५३

३६ **मराठा आरक्षण : महाराष्ट्राच्या राजकारणातील एक समस्या** – डॉ.विलास टाले, बुलढाणा ---- १५७

३७ **कौटुंबिक हिंसाचार, प्रतिबंधक कायदे व उपाययोजना : एक समाजशास्त्रीय अध्ययन**
– डॉ.उल्हास राठोड, कारंजा, जि.वर्धा ------------------------------------ १६२

३८ **मराठा आरक्षण : एक चळवळ** – डॉ.विनोद गायकवाड, शेगाव, जि. बुलढाणा ---------- १६६

३९ **पर्यावरण समस्या आणि भारतीय राजकारण** – डॉ.विनोद मुडे, वडनेर, ता.हिंगणघाट, जि.वर्धा. - १७०

४० **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिविषयक विचार**
– डॉ.विठ्ठल घिनमिने, वडनेर, ता.हिंगणघाट, जि.वर्धा ------------------------ १७५

४१ **भारतातील ग्रामीण आर्थिक विकासामध्ये गौण वनउपजाचे महत्व**
– १)प्रा.युवराज जांभुळकर, २)डॉ.एन.जी.उमाटे, भद्रावती, चंद्रपूर ----------------- १७९

४२ **जळगाव जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास**
– डॉ.विनोद नन्नवरे, जळगाव ------------------------------------------ १८३

४३ **महिलांमधील अंधश्रद्धेचा कुटुंबावर होणारा प्रभाव**
– १) प्रा.विरेनकुमार खोब्रागडे, २) डॉ. रणधीर साठे, चंद्रपूर. ------------------- १९०

४४ **प्राचीन भारताच्या आर्थिक जिवनातील स्थित्यंतरे (इ.स. पुर्व सहावे शतक)**
– डॉ.विशाल दौलतकर, राळेगाव ---------------------------------------- १९४

४५ **ग्रंथालयातील अभिलेखांचे शत्रू आणि उपाययोजना : एक चिकित्सक अध्ययन**
– १)प्रा.विनायक नाकतोडे, २)डॉ.रमणिक लेनगुरे, नागपूर --------------------- १९८

४६ **सहकार क्षेत्र आव्हाने आणि उपाय** – डॉ.ताई उके, अंजनगाव सुरजी, जि.अमरावती. ------- २०३

४७ **आधुनिक मराठी समीक्षासिद्धान्त** – डॉ.विजय रैवतकर, आरमोरी ------------------ २०८

४८ **आधुनिक समाजात महिलांचे योगदान : एक अवलोकन**
– डॉ.विठ्ठल चव्हाण, देसाईगंज, जि.गडचिरोली. ---------------------------- २१२

४९ **सद्यस्थितीत महात्मा गांधीच्या स्त्री विषयक विचारांची प्रासंगिकता**
– डॉ.विठोबा चंदनखेडे, समुद्रपूर, जि.वर्धा. -------------------------------- २१६

५० **भारतीय राज्यव्यवस्थेत महिलांचे प्रतिनिधीत्व : एक वास्तव**
– डॉ.विजया राऊत, मोहाडी, जि.भंडारा -------------------------------- २२०

# आधुनिक मराठी समीक्षासिद्धान्त

**प्रा. डॉ. विजय रैवतकर**
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी
मो. ९८२३८७९२०६

**सारांश :**

आधुनिक मराठी समीक्षासिद्धान्त कलात्मक आणि जीवनात्मक मूल्यांनी व्याप्त असले तरी मराठी साहित्य कलाकृतीचे यथार्थ दर्शन घडविण्यासाठी आणि मूल्यमापन करण्यासाठी जीवनवाद व कलावाद यापैकी कोणत्याही एका वादाचा स्वीकार करून केल्या गेलेले चिंतन पुरेसे ठरणारे नाही. या दोन्ही वादांतील सत्त्वांशाचा विचार करून वाङ्मयीन कलाकृतीच्या स्वरूपाविषयीचे व महत्तेविषयीचे निकष निश्चित करावे लागतात.

**बीजशब्द :**

साहित्यविचार, समीक्षा, साहित्यसिद्धांत, लयतत्त्व, महात्मता, मानुशता, देशीयता, जीवनवाद, कलावाद

**प्रस्तावना :**

आधुनिक मराठी समीक्षासिद्धान्त जीवनवादी व कलावादी अशा दोन विचारप्रवाहांतून विकसित होत गेलेले दिसून येतात. जीवनवाद्यांनी व कलावाद्यांनी स्वतंत्र अशा विचारसरणीतून साहित्यविषयक विविध मूलतत्त्वांची मांडणी केली व त्या मूल्यांच्या व निकषांच्या आधारे वाङ्मयकृतीची समीक्षा होऊ लागली. वाङ्मयीन समीक्षाव्यवहाराला त्यातून विवक्षित दृष्टी प्राप्त झाली. समीक्षासिद्धान्तामुळे साहित्यसमीक्षेचा व्यापार संपन्न झाला तथापि समीक्षासिद्धांतातील तत्त्वविचार पुष्कळदा जीवनवादातील व कलावादातील परस्परविरोधी वाटणाऱ्या मूल्यांच्या आणि निकषांच्या गुंत्यात अडकलेला दिसून येतो. त्या-त्या वादांच्या खंद्या समर्थकांच्या विचारांना त्या-त्या काळात अभिनिवेशाचे स्वरूप प्राप्त झाल्यामुळे समग्र आणि व्यापक दृष्टीने आधुनिक मराठी साहित्यसमीक्षेचे सिद्धान्त समजून घेण्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या. त्याचा प्रतिकूल परिणाम एकूण वाङ्मयनिर्मिती, आस्वाद आणि समीक्षा यावरही झालेला दिसून येतो. स्वाभाविकच या दोन्ही वादांच्या सापेक्षतेने व निरपेक्षतेने मराठी साहित्यसिद्धान्ताचे स्वरूप समजून घेणे अपरिहार्य ठरते.

**आधुनिक मराठी समीक्षासिद्धान्ताचे स्वरूप :**

आधुनिक मराठी समीक्षासिद्धांताची समृद्ध परंपरा आहे. मराठी समीक्षासिद्धातांनी मराठी समीक्षेचा व्यापार सिद्ध केला आहे. हरिभाऊ आपटे, श्री. कृ. कोल्हटकर, वा. म. जोगी, श्री. व्यं. केतकर, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, बा. सी. मर्ढेकर, पु. शि. रेगे, प्रभाकर पाध्ये, गंगाधर गाडगीळ, दि. पु. चित्रे, शरच्चंद्र मुक्तिबोध, द. ग. गोडसे, रा. भा. पाटणकर, भालचंद्र नेमाडे यांनी आधुनिक मराठी समीक्षासिद्धांताची मांडणी करून मराठी साहित्यसमीक्षेला नवी दृष्टी देण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत लेखाच्या अंगाने आधुनिक मराठी समीक्षासिद्धांताचा विचार करीत असताना वरील नामोल्लेखित सगळ्याच साहित्यमीमांसकांच्या साहित्यसिद्धातांचा विचार करणे शक्य असले तरी सदर लेखात काही मर्यादा घालून ना. सी. फडके, बा. सी. मर्ढेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध आणि भालचंद्र नेमाडे यांच्या समीक्षासिद्धांताचा परामर्श घेतला आहे.

ना. सी. फडके, बा. सी. मर्ढेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध आणि भालचंद्र नेमाडे या साहित्यमीमांसकांनी मराठी समीक्षासिद्धांताच्या अंगाने मौलिक अशी कामगिरी केली आहे. त्यांनी विविध दृष्टिकोनांतून साहित्याची चर्चा करून मूल्यसापेक्ष मांडणी केली.

ना. सी. फडक्यांनी मराठी साहित्यात त्यांच्या कलासंप्रदायी भूमिकेला रुजवण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांचे कलासंप्रदायी विचार तितके जोरकसपणे मराठी साहित्यविश्वात मूळ धरू शकले नाहीत. त्यांच्या विचारांवर परखड टीका झाली, हे होणे स्वाभाविक होते कारण साहित्यनिर्मात्याची कलाविषयक कारागिरी आणि रसिक, आस्वादकाचे रंजन या विचारांभोवतीच त्यांचा साहित्यविचार फिरताना दिसत होता. तथापि त्यांच्या साहित्यविचाराचे काहीएक योगदान मराठी साहित्याला नाही असे नाही. खरेतर त्यांच्या कलासंप्रदायी विचारांच्या प्रभावातून मराठी साहित्यात विविधांगी चर्चा होऊ लागली. प्रामुख्याने कला आणि जीवन या संघर्षात्मक विचारसणीवर गंभीरपणे विचार होऊ लागला. त्याची फलश्रुती म्हणजे मर्ढेकरांच्या रूपाने मराठी साहित्यातील कलाविचार आणि मुक्तिबोधांच्या रूपाने जीवनविचार अधिक सामर्थ्याने मराठी साहित्यक्षेत्रात पुढे येऊ शकला.

आधुनिक मराठी साहित्यसिद्धांतात मर्ढेकरांचे साहित्यसिद्धांत हे आकृतिवादी आणि रूपवादी भासत असले तरी त्यांची साहित्यदृष्टी जीवनमूल्यांनी युक्त आहे. त्यामुळे मराठी साहित्यसिद्धांत कलावादी आणि जीवनवादी अशा दोन्ही विचारसरणीतून अतिशय साक्तपणे पुढे आले. मर्ढेकरांनी अतिाय तर्कशुद्ध विचारांची बैठक मराठी साहित्यविश्वाला दिली. मर्ढेकरपूर्व आधुनिक मराठी साहित्यविचार मर्ढेकरांच्या तुलनेने प्राथमिक पातळीवरचा आहे. संस्कृत साहित्यशास्त्राच्या अनुशंगाने मराठीत जो साहित्यविचार प्रकट झाला आहे, तो संपूर्णपणे परभृतच समजावयास हवा. तो प्राधान्याने संस्कृतातील काव्यचर्चेच्या आणि रससर्चेच्या आधारे प्रकट झालेला आहे. संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांच्या विचारांचा अनुनय ज्याप्रमाणे साहित्यमीमांसक करताना दिसतात त्याचप्रमाणे पाश्चात्त्य साहित्यमीमांसकांची काही सूत्रे लक्षात घेऊन अर्वाचीन काळातील साहित्यसिद्धांत प्रकट झालेले दिसतात. मर्ढेकर हे पहिले आणि विचक्षण असे मराठी साहित्यशास्त्रज्ञ आहेत की ज्यांच्या साहित्यविचारातून त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व प्रकट होताना दिसते. त्यांच्यावर पाश्चात्त्य साहित्यशास्त्रज्ञांचा प्रभाव नाही असे नाही. ॲरिस्टॉटलपासून, आय. ए. रीचर्डस्‌पर्यंतच्या साहित्यशास्त्रज्ञांचा विचार त्यांनी अभ्यासलेला असल्याचे व तो पचवल्याचे लक्षात येते तथापि, त्यातील कोणत्याही एका विशिष्ट विचाराचा अनुनय करून त्यांनी आपला साहित्यविचार प्रकट केला नाही. साहित्यनिर्मिती करीत असताना, साहित्याचा आस्वाद घेत असताना किंवा त्याचे मूल्यमापन करीत असताना जे मूलभूत प्रश्न त्यांना पडले त्यांची उत्तरे शोधण्यातून मर्ढेकरांचे साहित्यशास्त्र उदयाला आले. ते इंग्रजी साहित्यशास्त्रज्ञांच्या विचारांचे एकत्रीकरण नव्हे. त्यामुळेच मर्ढेकरांच्या साहित्यशास्त्रात एकप्रकारची जिवंतता व सहानुभूती प्रकटली आहे. मर्ढेकरांनी मराठी साहित्यविचाराला दिलेला सौंदर्यविचार, वाङ्मयीन महात्मतेचा सिद्धान्त आणि भावनानिष्ठ समानतेचा सिद्धान्त या तीनही गोष्टी मौलिक स्वरूपाच्या असून मराठी साहित्यविचाराला कमालीच्या गती देणाऱ्या ठरल्या. मराठी साहित्यविचार यामुळे प्रगल्भ झाला. मर्ढेकरांनी मराठी साहित्यविचाराला जे वैचारिक अधिष्ठान दिले त्यामुळेच मुक्तिबोधादी साहित्यसमीक्षकांना आपला साहित्यविचार साकार करण्याची क्षमता प्राप्त झाली.

मर्ढेकरांचा कलाविचार हा स्वायगातावादी कलाविचार आहे. मर्ढेकरपूर्व काळात स्वायत्ततावादी कलाविचार अजिबात प्रकट झालेला नव्हता असे नाही. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांपासून ना. सी. फडके ह्यांच्या पर्यंत तो वेगवेगळ्या स्वरूपात प्रकट होत राहिला तरी त्याला भक्कम विचाराचे अधिष्ठान नव्हते. मर्ढेकरांनी फार प्रगल्भ पातळीवर ते अधिष्ठान प्राप्त करून दिले. मराठी कलावादाचे एका परीने पुनरुज्जीवन करून कलेच्या स्वायत्ततेचा पक्ष दृढमूल करण्याचे कार्य मर्ढेकरांच्या साहित्यविचाराने केले. कला ही केवळ स्वायत्त असते एवढेच म्हणून मर्ढेकर थांबले नाहीत तर वाङ्मयीन कलाकृतीच्या महत्त्वाची घटकतत्त्वे त्यांनी स्पष्ट केली.

मर्ढेकरांच्या नंतर मुक्तिबोधांनी मराठी साहित्यविचाराच्या संदर्भात जीवनवादी दृष्टिकोनातून मांडणी केली आणि त्यांनी जीवनमूल्यांच्या अनुशंगाने वाङ्मयीन महात्मतेचा विचार केला. मुक्तिबोधांच्या समीक्षासिद्धान्ताचे स्वरूप निश्चितच पृथगात्म असे आहे. त्यांनी मार्क्सवादी मूल्यविचाराच्या साहाय्याने त्यांची कलाविषयक भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी मार्क्सवादी विचारसणीच्या पुढील अशा मूल्यविचाराची दिशादर्शक मांडणी केली. त्यांची कलाविषयक मांडणी मर्ढेकरी विचारसणीच्या कालखंडाच्या विरोधी अशी होती. हा विरोध तात्त्विक अशा स्वरूपाचा होता. त्यामुळे या विरोधाचे स्वरूप मूल्यात्मक आहे, असे आपणास मानावे लागते. मुक्तिबोधांनी मर्ढेकरांच्या कलाविचाराला विरोधासाठी विरोध केला नाही तर त्यातील काही उणिवा सांगून आवश्यक घटकांचा त्यांनी स्वीकार केला. मुक्तिबोधांची साहित्यशास्त्रातील सिद्धान्तांच्या संदर्भात प्रतिवादाची भूमिका राहिली आहे. या प्रतिवादातून त्यांनी साहित्यकलेच्या आस्वादाकरिता आणि निर्मितीकरिता उपयोगी अशा मूल्यतत्त्वाची मांडणी करण्याचा सातत्याने प्रयत्न केला.

मुक्तिबोधांना मर्ढेकरांची मते मान्य नसली तरी मर्ढेकरांच्या साहित्यसिद्धांतातील तात्त्विकतेमुळेच त्यांच्याशी विरोध करण्याच्या एका विलक्षण इर्षेने मुक्तिबोधांची समीक्षा व साहित्यविचार आकारास आला व तोही सुरुवातीपासूनच म्हणजे 'काही निबंधा'तील लेखनापासूनच आकारास आला आहे. मुक्तिबोधांच्या प्रखर विचाराक्तीमुळे रसशास्त्राच्या खऱ्या मर्यादा रसिकांना कळल्या व श्रेष्ठ वाङ्मयीन कलाकृतीचे मूल्यमापन करण्याकरिता काही वेगळ्या कसोट्यांची आवश्यकता असल्याचे लक्षात आले. हे त्यांचे कार्य अत्यंत लक्षणीय स्वरूपाचे आहे. मर्ढेकरांचा वाङ्मयीन महात्मतेचा सिद्धान्त हा एकूण मराठी साहित्यविचारात

ज्या प्रमाणे क्रांतिकारक स्वरूपाचा ठरू शकेल असाच मुक्तिबोधांचा मानुषतेचा सिद्धान्तदेखील अशाच महत्त्वाचा ठरण्याची शक्यता नाकारता येण्यासारखी नाही.

मानुषमूल्यगर्भ दृष्टीतून सभोवतालच्या वास्तवाचे निरीक्षण, परीक्षण करणे हा त्यांचा स्थायिभाव असल्याने मानवी जीवनव्यवहारातील दु:ख, विविध विसंगती, गुंतागुंत, वैषम्य इत्यादींतून त्यांचे तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व विकसित होत गेले आणि या सर्वांतून त्यांनी वाङ्मयकलेच्या संदर्भात विवेचक अशा मूल्यविचारांची मांडणी केली. त्यांच्या मांडणीला साहित्यक्षेत्रात शीर्षस्थ असे स्थान आहे. ललित वाङ्मयाचे विश्व हे जीवनन्यायसंवादी विश्व असते, हे मुक्तिबोधांचे प्रतिपादन मौलिक स्वरूपाचे आहे. सामजिक अंगाने ते साहित्यव्यवहारातील कलावंत-कलाकृती-कलास्वाद या प्रक्रियेचा गांभीर्याने विचार करतात. ते केवळ गंभीर चिंतन करीत नाहीत, तर या व्यवहाराला पोषक अाा 'मानुषता' या मूल्यतगवाची सुसंगत मांडणी देखील करतात. मानुषता हे मूल्यतत्त्व मराठी साहित्यव्यवहारास नवीन आहे. माणुसकीच्या पातळीवरून वर्गीय जाणिवांशी संघर्ष करीत जीवनानुभवाचा अर्थ शोधण्याची कलावंताची प्रतिज्ञा जितकी मोठी असेल व जीवनव्यवहाराचा अर्थ लावताना माणुसकीचा जिवंतपणा जितका सखोलतेने प्रतीत होईल तितकी त्याची कृती श्रेष्ठ होण्यास साह्यभूत होते. मुक्तिबोधांचे हे साररूप विवेचन मराठी साहित्यविचारात नावीन्यपूर्ण व स्वीकार्ह असेच आहे. मुक्तिबोधांच्या साहित्यविचाराला तात्त्विक अधिष्ठान असल्यामुळे जीवनवादी समीक्षेचा पाया भक्कम झाला.

भालचंद्र नेमाड्यांनीदेखील मराठी साहित्यविचारात मौलिक अशी कामगिरी केली आहे. साहित्य ही जशी भूमिनिष्ठ प्रक्रिया आहे तीच समीक्षाही भूमिनिठ प्रक्रियाच असते याचे भान नेमाड्यांनी मराठी समीक्षेला पहिल्याप्रथम दिले आहे. मराठी वाङ्मयीन संस्कृतीतील रोगांची चिकित्सा करून नवा साहित्यविचार, नवीन परिभााा, मराठीचे भाकि भान यांच्या आधारे नेमाड्यांनी मराठी साहित्यविचारातील जळमटे काढून मराठी साहित्यविचाराला आणि मराठी भोला नवी दृष्टी देण्याचे प्रयत्न केले. नेमाड्यांच्या समीक्षासिद्धांतात सामाजिक आणि सांस्कृतिक अंगाने प्रकट झालेली देशीयता मराठी साहित्यातील महत्त्वाची उपलब्धी आहे. त्यांची देशीयतेची संकल्पना स्वच्छ व स्पष्ट अशा स्वरूपाची आहे. देशीयता आणि नैतिकता हे नेमाड्यांच्या समीक्षासिद्धांताचे मुख्य सूत्र आहे. त्यांच्या टीकालेखनातील मर्यादा दूर करून या सूत्रांच्या तपशिलात शिरल्यास त्यांच्या साहित्यविचाराचे मौलिकत्व स्पष्टपणे लक्षात येते. आपल्या वाङ्मयीन संस्कृतीतील बीजे घेऊन त्यांचा वृक्ष तयार करण्याचीच अपेक्षा नेमाडे करतात, हे महत्त्वाचे विशेष होय. वाङ्मय आणि संस्कृती यातील मेळ साधून आपल्या वाङ्मयसंस्कृतीची जोपासना करण्याची भूमिकाच नेमाडे निर्माते आणि आस्वादकांच्या संदर्भात वठवतात. नेमाडे हे प्रामुख्याने जीवनवादी विचारवंत व संवेदनील कलावंत तसेच जीवनसापेक्ष दृष्टीने कलेकडे पाहणारे साहित्यनिर्माते, साहित्यमीमांसक आहेत. कलेने वास्तवापासून स्वत:ची नाळ तोडू नये, साहित्यकृतीत खोट्या, परदेशी प्रेरणा व प्रवृत्ती, रेखाटू नयेत ही नेमाडे ह्यांची आंतरिक तळमळ आहे. कलावंत मनाने सामाजिक आणि सांस्कृतिक परिप्रेक्ष्यातून केलेला संवेदनशील विचार त्यांच्या साहित्यविचाराचे विशेष होय. नेमाड्यांना साहित्य आणि साहित्यव्यवहार एकसंध, मूल्याधिष्ठित व एकूण परंपरेच्या प्रवाहात विकसित व्हावा, असे वाटते. त्या त्या संस्कृतीच्या विकासातच त्या त्या वाङ्मयाच्या विकासाची, अस्सलतेची बीजे, तत्त्वे असतात, अशी त्यांची मूळ भूमिका आहे. आणि ह्या भूमिकेच्या परिप्रेक्ष्यातून ते देशीयता या मूल्यविचाराचा आग्रह सातत्याने धरतात. देशीयतेचे भानच आपल्याला परकीय, उसन्या वाङ्मयीन प्रवृत्ति-मूल्यांपासून दूर लोटून आपल्या अस्मितेला जागृत करेल व पूर्व मराठी परंपरेशी सूसंगत असे वाङ्मय (म्हणजेच मूळ देशीय) निर्माण होऊ शकेल, असे त्यांना वाटते. ब्रिटिशांच्या आगमनानंतर या देशातील मूळ सांस्कृतिक परंपरा खंडित होऊन एक उपरी वसाहतवादी अधांतरी कलामूल्ये जोपासणारी परंपरा निर्माण झाली त्यामुळे मूळ सांस्कृतिक प्रवाहांचे स्वरूप गढूळ आणि क्षीण झाले. ते पुन:स्थापित व्हावे, असा नेमाडे यांच्या विचाराचा रोख आहे. साहित्यकृतीची महत्ता वसाहतवादाने प्रभावित झालेल्या समीक्षाविचाराशिवाय साहित्यकृतीतून प्रकटणाऱ्या मूळ सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक गुणवैशिष्ट्यांतूनदेखील सिद्ध करता येणे शक्य आहे; या मूलभूत विचाराची सशक्त पायाभरणी नेमाड्यांनी मराठी समीक्षासिद्धांतात पहिल्याप्रथम केली.

ना. सी. फडके, बा. सी. मर्ढेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध आणि भालचंद्र नेमाडे ह्या साहित्यमीमांसकांनी मराठी साहित्यसमीक्षेला त्यांच्या तत्त्वविचारांतून एक मूलगामी बैठक प्राप्त करून दिली. त्यामुळे वाङ्मयनिर्मिती, आस्वाद आणि समीक्षा ह्यांना निश्चितच व्यवच्छेदक दिशा प्राप्त

झाली असे म्हणावे लागते.

वरील साहित्यमीमांसकांच्या समीक्षासिद्धांताच्या वेचक मांडणीमुळे साहित्याचे स्वरूप आणि प्रकृती, साहित्याचे प्रयोजनकार्य, साहित्यनिर्मिती आणि साहित्यानुभव या संबंधीच्या मराठी सिद्धान्तांचा, वादांचा, संकल्पनांचा, प्रवृत्तींचा, प्रवाहांचा परिचय वाचकांना होतो. साहित्याविषयीच्या अनेकविध गुंतागुंतीच्या आणि तात्त्विक प्रश्नांची त्याचप्रमाणे साहित्यकृतीच्या विश्लेषण-मूल्यमापनादी तत्त्वांची जाण अधिक प्रगल्भपणे स्पष्ट होत जाते. वाचक, रसिकांची आस्वादप्रक्रिया अधिक शास्त्रशुद्ध व वस्तुनिष्ठ होण्यास आधुनिक मराठी समीक्षासिद्धांताचे योगदान निश्चित उपयोगी ठरू शकणारे आहे.

**निष्कर्ष** :

१. मर्ढेकरांचे साहित्यसिद्धांत हे आकृतिवादी आणि रूपवादी भासत असले तरी त्यांची साहित्यदृष्टी जीवनमूल्यांनी युक्त आहे.
२. मराठी कलावादाचे एका परीने पुनरुज्जीवन करून कलेच्या स्वायत्ततेचा पक्ष दृढमूल करण्याचे कार्य मर्ढेकरांच्या समीक्षासिद्धान्ताने केले.
३. सामजिक अंगाने ते साहित्यव्यवहारातील कलावंत-कलाकृती-कलास्वाद या प्रक्रियेचा गांभीर्याने विचार करतात.
४. देशीयता आणि नैतिकता हे नेमाड्यांच्या समीक्षासिद्धांताचे मुख्य सूत्र आहे.
५. साहित्यकलेने वास्तवापासून स्वत:ची नाळ तोडू नये, साहित्यकृतीत खोट्या, परदेशी प्रेरणा व प्रवृत्ती, रेखाटू नयेत अशी नेमाडे ह्यांची भूमिका त्यांच्या समीक्षासिद्धांतातून स्पष्ट होते.

**संदर्भग्रंथ सूची** :

१. प्रतिभासाधन, देशमुख आणि कंपनी, पुणे, सोळावे मुद्रण, १९९५.
२. प्रतिभाविलास, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, १९६६.
३. सौंदर्य आणि साहित्य, मौज प्रकाशन, मुंबई, पा. आ., १९९२.
४. सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य, लोकवाङ्मयगृह, मुंबई, दु. आ., १९९७.
५. जीवन आणि साहित्य, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९७२.
६. टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दु. आ., २००१